महा.-४४६/२०१०एफ११२६३
स्थापना : २०११
संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043
संत नामदेव महाराज
शेलगाव(जं.)
श्री संत नामदेव महाराज
(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)
ता.- कळंब जि.- धाराशिव
* संस्थेचे मुख्य कार्य *
१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)
कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव
अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी
newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे

फ्रेंचाईजी देणे आहे
AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED
Shree Masala
गुंतवणूक २.५ लाख फक्त
आमच्या नामांकीत कंपनीची
संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे
--- आमची वैशिष्ट्ये ---
५ दिवसात व्यवसाय सुरू
कमी भांडवल जास्त नफा
स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
कुणीही हा व्यवसाय करु शकते
सहज, सरळ व सोपा व्यवसाय
तुम्हाला काहीही बनवायचे नाही
ग्राहकांची वाढती मागणी
आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...
संपर्क : ८०८०४९१८६९

• वर्ष ३ रे • अंक २५८ वा • पाने ४
बुलडाणा, रविवार, दि.२८ एप्रिल २०२४
• RNI NO. : MAHMAR/2022/82056 • किंमत : ३ रुपये



**अक्षराज : आकाश जयस्वाल**
**दि.२७, माहूर (नांदेड) :**
महाराष्ट्रातील साडे तीन शक्तिपीठापैकी एक माहूर गडावरील रेणुका आईच आजच सुंदर छायाचित्र.
**आईचे आजचे दर्शन माहुर गड जय जगदंब**

## राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा; केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** गुजरातमधील २ हजार मेट्रिक टन पांढरा कांद्यांच्या निर्यातीला केंद्र सरकारने परवानगी देण्याचा निर्णय घेतला होता.

यानंतर मात्र विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. जेष्ठ नेते शरद पवार आणि खासदार संजय राऊत यांनीही केंद्रावर निशाणा साधला होता. यानंतर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिसाला देण्याची मागणी करण्यात येत होती. यानंतर अखेर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत कांदा निर्यातीला परवानगी दिली आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे.



महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कांदा पिकवला जातो. महाराष्ट्र राज्य हे कांदा निर्यातीसाठी मोठा पुरवठादार राज्य मानले जाते . मात्र, केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत होता. कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्यांना योग्य दर मिळत नव्हते.

अशातच केंद्र सरकारने गुजरातमधील २ हजार मेट्रिक टन पांढरा कांदा निर्यात करण्याला परवानगी दिली. त्यामुळे महाराष्ट्रातील कांद्यांचे काय? असा सवाल विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केले. याचबरोबर कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारवर नाराजी व्यक्त केली.

यानंतर केंद्र सरकारने अखेर महाराष्ट्रातील कांदा निर्यात करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला. आता श्रीलंका, भुतान, बांगलादेश, बहरैन, युएई, मॉरिशस या देशांमध्ये कांदा निर्यात करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. आता जवळपास ९९ हजार १५० मेट्रीक टन कांद्यांची निर्यात करण्यास सरकारने परवानगी दिल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे.

**ठेकेदारांना मालामाल करण्याचा डाव : संजय राऊत**

गुजरातमधील २ हजार मेट्रिक टन सफेद कांद्यांच्या निर्यातीला केंद्र सरकारने परवानगी देण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ते म्हणाले होते, दोन हजार मेट्रिक टन गुजरातचा कांदा मुंबईच्याच न्हावा-शिवा पोर्टस् वरून परदेशात जाणार आहे. ऐन निवडणुकीत गुजरातच्या व्यापाऱ्यांना आणि ठेकेदारांना मालामाल करण्याचा हा डाव आहे. महाराष्ट्राचा कांदा हा सडत आहे, त्याला भाव नाही. येथे तुम्ही निर्यातबंदी केली. पण गुजरातचा पांढरा कांदा हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रिय आहे, अशी टीका संजय राऊत यांनी केली होती.

## थोडक्यात

### आज वडगावात आदित्य ठाकरेंची तोफ धडाडणार

**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.२७, वडगाव :** सध्या लोकसभा निवडणुकीसाठी अनेक गावात नेते मंडळी प्रचार करताना पाहायला मिळत आहेत. गाव भेटी पक्ष सभा यांचे नियोजन करण्यात प्रत्येक पक्ष व्यस्त आहे.लोकसभा मतदार संघातील इंडिया आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील सरूडकर यांच्या प्रचारासाठी युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांची आज रविवारी सायंकाळी सहा वाजता वडगाव नगरपालिका चौक येथे जाहीर सभा होणार आहे. अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख संजय चौगुले यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

सत्यजित पाटील यांच्या प्रचारार्थ होणाऱ्या सभेला शिवसेना उपनेते नितीन बानगुडे पाटील, सुषमा अंधारे,सतेज पाटील, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जिल्हा संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर, आमदार राजू बाबा



आवळे, जे आमदार राजू किसन आवळे सुजित मिंचेकर, गावच्या माजी नगराध्यक्ष विद्याताई पोळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या सभेला वडगाव व परिसरातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आव्हान जिल्हा प्रमुख संजय चौगुले यांनी केले आहे. पत्रकार परिषदेत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख संदीप पाटील, अनिल माने, अंकुश माने,किरण पडवळ, विकास कोळी त्यांच्यासह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

### शरदचंद्र पवार आज शेवगाव दौऱ्यावर
### आ. निलेश लंके साठी जाहीर सभेचे आयोजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहमदनगर :** नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ आठ दिवसात तिसऱ्यांदा या मतदारसंघात हजेरी लावणार आहेत. शेवगाव शहरातील खंडोबानगर येथे आज रविवारी दुपारी ३ वाजता प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले असून कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते,माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार असल्याची माहिती राष्ट्रवादी पक्ष शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश सचिव ऍड. प्रतापकाका ढाकणे यांनी दिली.

आमदार निलेश लंके स्वाभिमान जनसंवाद यात्रेच्या समारोपाला नगरच्या गांधी मैदानात शरद पवार, आदित्य ठाकरे, बाळासाहेब थोरात यांनी हजेरी लावली. या सभेलाही नगरकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. यानंतर राहुरी येथे झालेल्या प्रचारसभेला मतदारांनी भर उन्हात मोठा प्रतिसाद दिला. त्या पाठोपाठ आज शरद पवार यांची सभा शेवगाव येथे होत आहे. या सभेलाही मतदार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचा विश्वास ऍड. प्रताप ढाकणे यांनी व्यक्त केला.

## नाशिक लोकसभेसाठी महंत अनिकेत शास्त्रींची उडी! चर्चेला उधाण...

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२७, नाशिक :** नाशिक लोकसभा मतदारसंघ विविध राजकीय घडामोडींमुळे चर्चेत आला आहे. सुरुवातीपासून या मतदारसंघावर शिंदेंच्या शिवसेनेकडून दावा करण्यात आला होता.

मात्र, त्यानंतर महायुतीमधील घटक पक्ष असणाऱ्या भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या गटाने देखील दावा केला होता. त्यामुळे महायुतीला नाशिक लोकसभा मतदारसंघात उमेदवार जाहीर करण्यात उशीर होत असल्याचे बोलले जात आहे.राष्ट्रवादीच्या कोट्यातून नाशिकच्या जागेसाठी मंत्री छगन भुजबळ निवडणूक लढविण्यास इच्छुक असताना, महायुतीकडून उमेदवार जाहीर करण्यास उशीर होत असल्याचे कारण देत भुजबळांनी काही दिवसांपूर्वी निवडणुकीतून माघार घेतली असली तरी या मतदारसंघावर पक्षाचा दावा कायम असल्याचे म्हटले. दुसरीकडे भाजपने देखील या मतदारसंघात आपले आमदार, नगरसेवकांची संख्या जास्त असल्याने दावा केला आहे. त्यातच कालपासून नाशिक लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून पहिल्या दिवशी तब्बल नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी १२८ अर्जांची विक्री झाली. ३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

यात प्रामुख्याने नाशिकसाठी १००८ महामंडलेश्वर शांतिगिरी महाराज यांनी अर्ज दाखल केला. दिंडोरीसाठी माकपचे माजी आमदार जे पी गावित



आणि सुभाष चौधरी यांनी अर्ज दाखल केला. नाशिकचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे, ठाकरे गटाचे महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्यासह, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार करण गायकर, माजी महापौर दशरथ पाटील, माजी स्थायी सभापती दिनकर पाटील, स्वामी सिध्देश्वरानंद सरस्वती सह ८७ इच्छुक उमेदवारांनी पहिल्याच दिवशी नाशिक लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज नेले. नाशिक लोकसभा निवडणुकीत चर्चेला चांगलेच उधान आले आहे.

नाशिक लोकसभेच्या रिंगणात महंत अनिकेत शास्त्री हे देखील उतरले असून त्यांनी भाजपकडून निवडणूक लढत असल्याचा दावा केला आहे. भाजपच्या पक्षश्रेष्ठींनी अर्ज भरण्यास सांगितले असल्याचे महंत अनिकेत शास्त्री यांनी म्हटले आहे. महायुतीमधील नाशिकच्या जागेचा तिढा कायम असतानाच आता महंत अनिकेत शास्त्री यांच्या दाव्यामुळे नवा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे महायुतीमधील नाशिक लोकसभेच्या उमेदवारीचा गोधळ वाढतोय असे वाटते का?

## बुलढाण्यात तब्बल पावणेसात लाख मतदारांची मतदानाकडे पाठ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, बुलडाणा :** अंतिम टप्प्यापर्यंत अत्यंत चुरशीची लढत ठरलेल्या बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या लढतीत तब्बल पावणेसात लाखांपेक्षा जास्त मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवल्याचे दुर्दैवी व तितकेच गंभीर चित्र आहे. थेट निवडणूक आयोग ते जिल्हा प्रशासनाने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी केलेले शर्थीचे प्रयत्न, प्रचाराचा गाजावाजा, मोठ्या संख्येतील उमेदवार, याउप्परही तब्बल ३८ टक्के मतदारांनी मतदान न करणे, हा चिंता व चिंतनाचा विषय ठरावा.

यंदा आयोगाच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासन व निवडणूक विभागाने दीडेक महिन्यापासून सतत विविध उपक्रम राबविले. यातून मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यात मतदान जागृती करण्यात आली. यात स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना यांनीही हातभार लावला. यामुळे जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी यंदा ७० टक्के मतदानाची शक्यता वर्तविली होती. निवडणूक रिंगणात तब्बल २१ उमेदवार होते. महायुतीचे प्रतापराव जाधव यांनी झंझावती प्रचार करून मोठ्या संख्येने प्रचारसभा लावल्या. महाविकास आघाडीचे उमेदवार नरेंद्र खेडेकर यांच्यासह अपक्ष रविकांत तुपकर, संदीप शेळके या उमेदवारांनीही 'रोड शो', प्रचारफेऱ्या काढून वातावरण निर्मिती केली. वंचित, बसपा यांसह इतर अपक्षांनी आपापल्या परीने प्रचार केला. मतदारसंघात हजारो प्रचाररथ, ध्वनिवर्धक, फलक, याद्वारे प्रचार करण्यात आला. समाजमाध्यमे तर निवडणुकांनी व्यापून गेल्याचे दिसून आले.

**सामूहिक रोष?**

रिंगणात युती, आघाडी, दोन तगडे अपक्ष, वंचित, असे पर्याय होते. अपक्षांची भरमार होती. खासदारांविरुद्ध काहीसा रोष असला तरी मतदारांना अन्य पर्यायही होते. याउप्परही सगळ्यांना नापसंत करून रोष व्यक्त करायचा तर 'नोटा'च्या रुपाने बाविसावा पर्याय देखील होता. असे असतानाही ६ लाख ७६ हजार ९३९ मतदारांनी पवित्र हक्क बजावण्याचे टाळणे, ही धक्कादायक बाबच ठरावी.

**विधानसभानिहाय नाकर्ते मतदार**

बुलढाणा विधानसभा मतदारसंघात २९३४४९ पैकी १,३५ ११८ मतदारांनी मतदान करण्याचे टाळले. सुशिक्षित, नोकरदार वर्गाचा, जिल्हा मुख्यालय केंद्रबिंदू असलेला हा मतदारसंघ आहे. याशिवाय, चिखली ११०१८९, सिंदखेडराजा १२१४३०, मेहकर १०५१५५, जळगाव १०७२२७ आणि खामगावातील ९७८२० मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली.

## मुंबई विमानतळावर बॉम्बची धमकी !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** मुंबई विमानतळाच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनी करून विमानतळाच्या टर्मिनल-१ वर बॉम्ब असल्याचे सांगून धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध मुंबई पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला. धमकीच्या दूरध्वनीनंतर सर्व संबंधित सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल-१ वरील वरिष्ठ कार्यकारी अधिकारी गीतांजली नेरुरकर (३७) शुक्रवारी सकाळी कामावर उपस्थित होत्या. त्यावेळी तेथील संपर्क क्रमांकावर एका अनोळखी क्रमांकावरून दूरध्वनी आला. टर्मिनल – १ वर बॉम्ब ठेवण्यात आल्याचे दूरध्वनी करणाऱ्याने सांगितले.

आपण कोठून फोन करत आहात, अशी विचारणा नेरूरकर यांनी त्याला केली. तेव्हा त्याने इंग्रजीत 'नवपाडा' असे उत्तर दिले. त्यानंतर तुम्हाला शुभेच्छा असे सांगून त्याने दूरध्वनी ठेवला.

नेरुरकर यांनी ताबडतोब त्यांच्या वरिष्ठांना ही बाब कळवली. त्यानंतर विमानतळावरील अधिकाऱ्यांनी तात्काळ बॉम्ब थ्रेट असेसमेंट समितीची बैठक घेतली. सर्व संबंधित सुरक्षा यंत्रणांना सतर्क करण्यात आले. त्यानंतर तातडीने विमानतळाची तपासणी करण्यात आली. मात्र काहीच संशयस्पद सापडले नाही.

याप्रकरणी तक्रारीनंतर विमानतळ पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ५०५ (१) (बी), ५०६ (२) आणि ५०७ अंतर्गत गुन्हा दाखल केला. दूरध्वनी करणाऱ्या आरोपीचा शोध घेण्याचाही प्रयत्न सुरू आहे, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. आरोपीला अटक केल्यानंतरच धमकीच्या दूरध्वनीमागील नेमके कारण समजू शकेल, असे अधिकाऱ्याने सांगितले.




## सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासावरच गदा

भारतीय रेल्वे ही भारतीयांची जीवनवाहिनी आहे. दररोज रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या कोट्यावधीच्या घरात आहे. एकट्या मुंबईत दररोज पाऊण कोटी लोक रेल्वेने प्रवास करतात. यावरून संपूर्ण देशात किती प्रवासी रेल्वेने प्रवास करतात याचा अंदाज लावता येईल.

सर्वाधिक प्रवासी संख्या असल्याने सरकारला सर्वाधिक महसुल देखील रेल्वेच मिळवून देते. जवळचा प्रवास करण्यासाठी प्रवासी उपनगरी रेल्वे सेवेचा आधार घेतात तसाच लांबचा प्रवास करण्यासाठी प्रवासी दीर्घ पल्ल्याच्या रेल्वेचा आधार घेतात. रेल्वेचा प्रवास म्हणजे कमी पैशात सुखकर प्रवास. कितीही लांबचा प्रवास असेल तरी रेल्वेत थकवा किंवा शिन येत नाही कारण लांबच्या प्रवासाचे आरक्षण अधिच केलेले असते. आरक्षण मिळाले की प्रवासी निश्चीन्त असे. रेल्वे गाड्याही पुरेश्या असल्याने सर्वांना आरक्षण मिळत, ज्यांना आरक्षण मिळत नाही ते जनरल डब्यातून प्रवास करत मात्र देशात कोरोना आला आणि हे सर्व चित्र बदलले. कोरोनामुळे लॉक डाऊन लागू झाले आणि दीर्घ पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना ब्रेक लागला. लॉक डाऊन उठल्यानंतर मात्र पूर्वीचे हे चित्र बदलले. रेल्वे प्रशासनाने काही दीर्घ पल्ल्यांच्या एक्सप्रेस गाड्यांचे मार्ग बदलले तर काही एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या. आता तर दीर्घ पल्ल्याच्या एक्सप्रेस गाड्यांमधील डब्यांच्या रचनेत धोरणात्मक बदल करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. या धोरणानुसार आता मेल, एक्सप्रेस, सुपरफास्ट एक्सप्रेसमधून जनरल डबे पूर्णपणे हटवले जाणार आहेत. त्यामुळे येत्या काळात केवळ या गाड्यांमध्ये वातानुकूलित कोचच असणार आहेत. याची सुरवातही रेल्वेने केली असून अनेक एक्सप्रेस गाड्यांचे स्लीपर कोच कमी केले असून काही गाड्यांचे जनरल डबे बंद केले आहेत. रेल्वेने स्लीपर कोच कमी केल्याने सर्वसामान्य प्रवाशांना प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूर्वी एका रेल्वेत १२ स्लीपर कोच तसेच चार जनरल डबे असायचे आता ही संख्या ५ ते ७ वर आल्याने गरिब तसेच सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला झळ बसत आहे.

स्लीपर कोच काढून त्या ऐवजी वातानुकूलित कोच वाढवल्याने स्लीपर कोचचे आरक्षण मिळत नाही त्यामुळे प्रवाशांना द्वितीय श्रेणीचे वातानुकूलित तिकीट काढावे लागत आहे हे तिकीट सर्वसामान्य तिकिटाच्या दरापेक्षा पाचपट अधिक आहे त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना आर्थिक झळ बसत आहे. जनरल डबे कमी केल्याने जनरल डब्यात पाय ठेवायलाही जागा नसते. रेल्वेने डब्यांच्या रचनेत बदल करताना सर्वसामान्य, गरीब प्रवाशांचा विचारच केला नाही. सर्वच प्रवाशांना वातानुकूलित कोचचे तिकीट काढणे शक्य नाही त्यामुळे त्यांच्या प्रवासावरच रेल्वेने गदा आणली आहे. गरीब तसेच सर्वसामान्य प्रवाशांनी रेल्वेतून प्रवास करू नये असेच हे धोरण आहे. रेल्वेने हे नवीन धोरण बदलून पूर्वीप्रमाणे स्लीपर तसेच जनरल डब्यांची रचना ठेवून गरीब तसेच सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा द्यावा. जर रेल्वेने हे नवीन धोरण बदलले नाही तर भविष्यात रेल्वेला प्रवाशांच्या मोठ्या रोषाला सामोरे जावे लागेल.

# अहो, त्यांचं सोडा, सोडा...!! ओव्हर टेकरांचा नादच खुळा!

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो.

मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वर्दळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण हम भी किसीसे कम नही! हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो.

परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून सदैव सैनिका पुढेच जायचे! या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. किंवा नुसतीच त्याला मिरवायचे असते की आपण किती कार्यतत्पर आहोत. आपली कामाची उरक लोकांच्या डोळ्यांत त्वरेने भरण्याची घाई त्याला झालेली असते. जशी आपल्याकडे झाडीबोलीतील एक म्हण प्रसिद्ध आहे तशी-

**येलपाडीचे (मिजासखोर स्त्रीचे) आले डोळे।**
**खाटले ठेवून खाल्या लोळे।।**

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली.

तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली? म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो? तरीही बिच्चारा युवक शांतच! अशा या भानगडी विनाकारण जीवावर बेतत असतात. तरीही ओव्हर टेकर्सना यात काहीच कशी लाज-शरम वाटत नाही? ईश्वरप्राती करून ब्रह्मानंद प्राप्तीसाठी अशी तातडी, असे साधकांना ओव्हर टेक करणारे महाभाग मात्र क्वचितच दृष्टीस पडतात. कारण या आध्यात्मिक, भक्तिमार्गावर चालणारा लंगडालुळा होत नाही तर त्याचा थेट पुनर्जन्मच होतो, एक खरा भला माणूस म्हणूनच!

समजा, आपली एखादी मूल्यवान वस्तू घरातच कुठेतरी हरवली. ती जोपर्यंत आपल्या दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मनास चैन पडेल तर शप्पथ! ती शोधण्यासाठी आपण एका पाठोपाठ एक साधन वापरतो. कधी काठीने, कधी झाडूने ओढून, ढकलून वा चाचपडून बघतो. तर कधी विजेरीचा प्रकाशझोत टाकून डोळे फाडफाडून पाहतो. ती वस्तू सांपडत नाही, तोवर शोध घेणे आपण थांबवित नाही. सहज एखादे सद्गृहस्थ यावे आणि वस्तू उचलून तुम्ही शोधत आहात ते हेच का? असे उच्चारताच आपली उत्सुकता शिगेला पोहोचते.

झटकन ती वस्तू हातात घेऊन तिला निरखून बघतो आणि मोठ्या आनंदाने खड्या आवाज म्हणतो, अहो, ती हीच माझी अमोलक वस्तू! मी हीलाच शोधत होतो. असे म्हणून आपण पूर्वीप्रमाणे ती वस्तू शोधत राहाल का? नाही. आधी त्या दात्या व्यक्तीस अनेक नमस्कार घालतो, धन्यवाद देऊन त्याचे स्तुतीपाठ गातो. आजीवन ऋणी व उपकृत राहण्याचे बोलून दाखवितो व वचनबद्ध होतो. आपण परत त्याच वस्तूचा शोध सुरूच ठेवला, तर लोक आपल्याला नक्कीच मूर्ख ठरवतील. मात्र त्या वस्तूची स्वच्छता, सुरक्षा, सुशोभन, कलाकुसर, काळजी आदी वेळोंवेळी चालवित असतो. अगदी असेच ब्रह्मानंद व इश्वरप्राप्तीस केल्या जाणाऱ्या भक्ती वा पुजापाठाचे आहे. विचारा, कसे? तर आपण पुजापाठ कशासाठी करतो? त्यामागील उद्देश साफ-स्पष्ट असावा लागतो. ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद मिळवावे, असा उद्देश असेल तर वरील दृष्टांत तंतोतंत लागू पडतो. त्यासाठीच आपण पुजापाठ, जप, तप, योगयाग करत असतो.

परंतु अनेक शोध शोधांती एखादा ब्रह्मवेत्ता सद्गुरू मिळाला आणि त्याने ब्रह्मदर्शन घडवून दिले. तर मग परत तसलेच पुजापाठ करत बसणे योग्य राहील का? नाही ना! म्हणून मग केवळ ईश्वरास आमरण प्रसन्न ठेवण्यासाठी सद्गुरूच्या आदेश व वचनांचे पालन करत त्यालाच आपण सदैव हसतमुख ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे सर्वश्रुत आहे, हीच खऱ्या ब्रह्मानंदप्राप्त साधकांची परंपरा आहे. आपण जिथून सुरूवात केली होती, तिथे थांबून सांगावेसे वाटते, की ओव्हर टेक करणारास पुढे जाऊ द्या, पण मागे पडणाराने अजिबात चालाखी करू नये.

पुढे जाणारास पुढ्यात घेऊन त्याच्या यशस्वीतेबद्दल सहकार्य द्यावे, यामुळे काय होईल? तर वाईट प्रसंग वा अप्रिय घटना अजिबात उद्भवणार नाही. वादंग वा हिंसाचाराला आपणच ब्रेक लावू शकाल, एवढे मात्र निश्चित! यात तुम्हाला जो आनंद मिळेल; तो खरोखरच ब्रह्मानंद असेल..!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री. कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली**
**फक्त मधुभाष- ७७७५०४१०८६.**

# शहापूरात वज्रमुठ एकत्र येऊन निवडणूक जिंकणार

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२७, शहापूर (ठाणे) :** आज शहापूर आसनगाव येथे भिवंडी लोकसभेच्या महाविकास आघाडीचे उमेदवार बाळ्यामामा म्हात्रे यांच्या प्रचारार्थ पत्रकार परिषद संपन्न झाली.यावेळी महाविकास आघाडीचे प्रत्येक घटकपक्षाने आपली भुमिका ठाम मांडली. घटकपक्षाच्या पदाधिकार्यांनी आम्ही मागचे मतभेद विसरून सर्व व्रजमुठ एकत्र येऊन ही निवडणूक जिंकूण दाखवणार असल्याचे स्पष्ट केले. लोकशाही टिकवण्यासाठी आपल्याला महाविकास



आघाडीचे उमेदवार बाळ्यामामा म्हात्रे यांना ७० ते ८० हजार मतांची लीड शहापूरमधून घेणार असल्याचे सांगितले. उद्यापासूनच बाळ्यामामा म्हात्रे यांचा प्रचार दौरा शहापूरातून सुरू होणार आहे.यावेळी जेष्ठ पत्रकार प्रकश जाधव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमावेळी माजी आमदार पांडुरंग बरोरा,शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख शंकर खाडे,काँग्रेसचे जेष्ठ नेते आबा अधिकारी,राष्ट्रवादीच्या विद्याताई वेखंडे,शिवसेनेचे जिल्हा सचिव काशिनाथ तिवरे,शिवसेना शहापूर तालुक प्रमुख बाळा धानके,राष्टीवादीचे शहापूर तालुका प्रमुख मनोज विशे,रवि पाटील,तालुका सचिव रविंद्र लकडे,अंकुश भोईर,दिलीप अधिकारी,सीपीएम वळंबा व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## उसाळा...

माणूस गेल्या नंतर
कसा येतो उमाळा
आठवण सांगताना
किती देतो उजाळा

असलेनसलेले गुण
घासघासून उगाळा
ओढून ताणून सांगे
शिराळाला उबाळा

गेल्यावर कटुत्व ना
दोष आवर्जून गाळा
डम्प करुन ठेवायचे
मना साठल्या गाळा

व्यवस्थीत म्हणायचे
भले असूद्या गबाळा
परत येणार नाही तो
पथ्य काही सांभाळा

असे पर्यंत छळवादी
शुष्कसंतप्त उन्हाळा
मयतावर स्तुती फुले
रिमझिमी पावसाळा

दुटप्पी आपले चेहरे
कसा ना येई कंटाळा
जीवंत माणसा सोडे
जा कलेवर कवटाळा

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

## वाचकांचं पत्र !

### मुजोर अधिकाऱ्यांना स्मार्ट पद्धतीने धडा शिकवा !

ऐन उन्हाळ्याच्या काळात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या ऐरोली येथील नागरिकांनी गेल्या आठवड्यात ऐरोली परिसरातील महावितरण कार्यालयाची तोडफोड केली तसेच वितरण विभागाच्या कर्मचाऱ्यांनाही मारहाण केली. सरकारी कर्मचाऱ्यांना मारझोड झाल्याच्या घटना वर्षभर कुठेना ना कुठे सुरुच असतात. नागरिकांच्या सहनशक्तीचा कडेलोट झाला कि नागरिक रुद्रावतार धारण करतात आणि मग असे प्रसंग घडतात. सेवेत असताना सरकारी अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना मारहाण करणे यासाठी स्वतंत्र कायदे आहेत त्यामुळे अशा कायद्याखाली आपल्याला अटक होऊ शकते हे ज्ञात असताना नागरिक हिंसेचे पाऊल उचलतात याचा अर्थ त्यांनी हा निर्णय घेण्याआधी भरपूर काही सोसले आहे हे स्पष्ट होते. सरकारी कामकाजाची गती आणि तेथील भ्रष्टाचार याविषयी सर्वसामान्य नागरिकांना पुरेशी जाण असते. एखाद्या भ्रष्ट अथवा कामचुकार अधिकाऱ्याला मुन्नाभाई एमबीबीएस प्रमाणे गांधींगिरीने उत्तर देणे सर्वांनाच जमते असे नाही. त्यासाठी धाडस आणि हुशारी लागते ती सर्वांकडे नसते. त्याऐवजी अशा कामचुकार कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना इंगा दाखवणे हा त्यातल्या त्यात सोयीचा आणि सर्वांना जमणारा भाग आहे. पावसाळ्याआधी नाल्यांची सफाई नीट झाली नाही, रस्त्यावरील खड्डे वेळेत बुजवले गेले नाहीत तर दरवर्षी संबंधीत अधिकारी आणि कर्मचारी कुठे ना कुठे मार खातातच. परिसरातील कचरा वेळेत उचलला गेला नाही, पूर्वसूचना न देता पाणी गेले आणि २-३ दिवस आलेच नाही अशा एकना अनेक प्रसंगात नागरिकांचा संयम तुटतो. असे काही प्रसंग घडल्यावर सर्वप्रथम स्थानिक लोकप्रतिनिधींसमोर गाऱ्हाणे घातले जाते. काही समस्यांच्या बाबतीत लोकप्रतिनिधीही हतबल झालेले असतात त्यामुळे तेही नागरिकांच्या क्रोधाग्नीत तेल ओतण्याचे काम करतात. पूर्वी सरकार दरबारी समस्या मांडण्यासाठी लिखित अर्ज करावा लागे, त्यासाठी नोकरी व्यवसायातून सुट्टी घेऊन सरकारी कार्यालयांत रांगा लावाव्या लागत. आज मात्र काळ बदलला आहे. आज सर्वच क्षेत्रांत डिजिटलायजेशन झाले आहे. घर बसल्या तुम्ही आपल्या मोबाईलवरून कोणत्याही सरकारी खात्याला अर्ज अथवा तक्रार करू शकता तसेच केलेल्या तक्रारीचा नंतर पाठपुरावाही करू शकता. खालच्या अधिकाऱ्याकडून काम होत नसेल तर त्याची वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रार प्रविष्ट करू शकता, असे करत करत तुम्ही थेट मुख्यमंत्र्यांपासून तर पंतप्रधानांपर्यंत आपली तक्रार पोहोचवू शकता, तेही कमी श्रमात आणि कमी वेळेत. त्यामुळे हातातील स्मार्टफोनचा वापर केवळ गेम्स खेळण्यासाठी आणि रिल्स पाहण्यासाठी न करता विधायक कामांसाठीही करायला हवा ! मुजोर आणि कामचुकार सरकारी अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना आता बळाचा वापर करून नव्हे तर स्मार्ट पद्धतीने धडा शिकवायला हवा !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## गळा आवळून एकाचा खुन !




**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२६, उदगीर (लातूर) :** उदगीर तालुक्यातील चौडी येथे डोळ्यात मिरची पूड टाकून, गळा आवळून पन्नासवर्षीय व्यक्तीचा खून केल्याची घटना चौंडी ता. उदगीर येथे गुरुवारी २५ रात्री साडेअकराच्या सुमारास घडली. सहा संशयितांनी हे कृत्य केले. वाढवणा पोलीस ठाण्याच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याच्या कारणावरून सूर्यकांत ऊर्फ बाबू सुदाम बिरादार वय ५०यांच्या डोळ्यात संशयितांनी मिरची पूड टाकली. काठीने मारहाण केली व दोरीने गळा आवळून त्यांचा खून केला. लातूर जिल्हाधिकाऱ्यांनी लागू केलेल्या जमावबंदी आदेशाचेही संशयितांनी उल्लंघन केले, अशा आशयाची फिर्यादी श्यामराव शिवाजी वाघमोडे, ३२, रा. उंदरी, ता. मुखेड, जि. नांदेड,

उदगीर यांनी दिली. त्यावरून संशयित शुभम ऊर्फ छकुल्या संजीव बिरादार, बालाजी ऊर्फ पप्या संजीव बिरादार, केवळबाई संजीव बिरादार, कचरू जीवन डोईफोडे, लक्ष्मण जीवन डोईफोडे, विलास जीवन डोईफोडे सर्व रा. चोंडी यांच्याविरुद्ध वाढवणा पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला. शुभम ऊर्फ छकुल्या संजीव बिरादार, बालाजी ऊर्फ पप्या संजीव बिरादार यांना अटक करण्यात आली आहे. सहायक पोलीस निरीक्षक भीमराव गायकवाड तपास करीत आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# सन २०२४-२५ मधील अनधिकृत शाळांची यादी प्रसिध्द

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मार्च २०२४ अखेर ५ प्राथमिक शाळा शासनाची, नवी मुंबई महानगरपालिकेची मान्यता न घेता अनधिकृतपणे चालू असल्याचे निदर्शनास आले आहे.

आरटीई अधिनियम २००९ मधील कलम १८ अन्वये कोणतीही नवीन शाळा मान्यते शिवाय चालविता येत नाही.

तरी संबंधित शाळा व्यवस्थापकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना नजीकच्या महानगरपालिका किंवा अन्य मान्यता प्राप्त खाजगी शाळेत पालकांची संपर्क साधून पुढील शिक्षणासाठी दाखल करावे आणि परवानगीशिवाय सुरू केलेले शाळा तात्काळ बंद करावी. अन्यथा आपणाविरूध्द बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम १८ (५) नुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी असे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने जाहीर करण्यात

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| 1 | इस्माइल एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई | अल मोमीन स्कुल, आर्टिस्ट व्हिलेज, सेक्टर-8 बी, सी.बी.डी. बेलापूर. | इंग्रजी |
| 2 | ग्लोबल एज्युकेशन ट्रस्ट, अग्रीपाडा, मुंबई | इकरा ईस्लामिक स्कुल ॲण्ड मक्तब, सेक्टर-27, नेरूळ | इंग्रजी |
| 3 | आटपती एज्युकेशन ट्रस्ट, नेरूळ, सिवूड. | ऑर्किडस् द इंटरनॅशनल स्कुल (CBSE), सीवुड, सेक्टर-40, नेरूळ. | इंग्रजी |
| 4 | इलिम फुल गोस्पेल ट्रस्ट, ऐरोली | इलिम इंग्लिश स्कुल, आंबेडकर नगर, रबाले | इंग्रजी |
| 5 | मारानाथ संस्था | शालोम प्रि प्रायमरी स्कुल, शिवशक्तीनगर, शर्मायी मंदिर रोड, तुर्भे स्टोअर्स, नवी मुंबई. | इंग्रजी |

येत आहे.

या अनधिकृत शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्यांचे नव्याने प्रवेश घेऊ नयेत. तसेच ज्या पालकांनी आपल्या पाल्याचे प्रवेश या अनधिकृत शाळेत घेतले आहेत, त्यांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश रद्द करून नजिकच्या शासनमान्य शाळेत प्रवेश घ्यावा, जेणेकरून त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही असेही महानगरपालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

# ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींचे ऑडिट करणे आवश्यक !

**अक्षराज जे. के. पोळ**

**दि.२७, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रा मधील धोकादायक इमारतीचे सन २०२४-२५ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर एकूण ५३५ इमारती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ पोट कलम १,२,३,४ अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६५ (अ) नुसार ज्या इमारतींचा वापर सुरू होऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा इमारतींचे नवी मुंबई महानगर पालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून किंवा संरचना अभियंत्याकडून संरचना परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करून घेणे अनिवार्य आहे.



३० वर्षांपेक्षा जास्त काळ इमारतीचा वापर किंवा इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (पूर्ण अथवा अंशत:) क्षेत्रफळ वापराखाली आणले गेले अशा दिवसापासून मोजावयाचा आहे. नेमलेल्या संरचना अभियंत्याने शिफारशी केलेली दुरूस्तीची कामे पूर्ण झाल्याचे व ते बांधकाम सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र नवी मुंबई महानगरपालिकेकडे सादर करावे. या प्रकारे संरचना परीक्षण करण्याचे उत्तरदायित्व जी संस्था, मालक, भोगवटादार पार पाडण्यास टाळाटाळ करतील त्यांना रूपये २५,०००/- अथवा सदर मिळकतीच्या वार्षिक मालमत्ता कराची रक्कम यातील जी जास्त असेल तितक्या रक्कमेचा दंड ठोठवावयाची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३९८ (अ) खाली अंतर्भूत करण्यात आलेली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने संरचनात्मक परीक्षक (स्ट्रक्चरल इंजिनियर) यांची यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in संकेत स्थळावर (वेबसाईट वर) उपलब्ध करून दिलेली आहे.

३० वर्षांपेक्षा जास्त काळ झालेल्या इमारतीचे संरचनात्मक परीक्षण दिनांक ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी पूर्ण करून याबाबतचा अहवाल संबधित विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी किंवा सहाय्यक संचालक नगररचना, नवी मुंबई महानगर पालिका यांचेकडे सादर करावयाचा आहे.

धोकादायक झालेल्या इमारतींचा, घरांचा वापर करणे जिकरीचे आहे. त्यामुळे जिवीत व वित्त हानी होऊ शकते म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा, घराचा रहिवास अथवा वापर तात्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन करण्यात येत आहे. अन्यथा दुर्दैवी अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधितांची राहील याची नोंद घेण्यात यावी असे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

# बीएसपी कार्यकर्ता बैठक संपन्न



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, वाशी (नवी मुंबई) :** बहुजन समाज पार्टी, ठाणे लोकसभा अंतर्गत कार्यकर्ता बैठक कन्नड संघ, सेक्टर ९, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्राचे महासचिव तथा कोकण विभाग प्रभारी प्रा. डॉ. प्रशांत इंगळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच ठाणे जिल्हाध्यक्ष संतोष भालेराव, प्रभारी ॲड. धनंजय माने, कल्पना किरतकर, मधुकर बनसोड, लोकसभा अध्यक्ष राजेश जैस्वार, यांच्यासह नवी मुंबई अध्यक्ष प्रा. दत्ता हेगडे, प्रभारी संजय गायकवाड, उपाध्यक्ष अरविंद राव, महासचिव रवींद्र सूर्यवंशी, बेलापूर विधानसभा अध्यक्ष विनोद धुरंदर, महिला अध्यक्ष मयुरी सावंत तसेच अनिता सोनवले, आशा नगरकर, सिद्धार्थ ठोकळे, गौतम तायडे, उमेश राम, मधुसूदन धेंडे, मुकेश आदी पदाधिकारी कार्यकर्ते व हितचिंतक उपस्थित होते. या मिटींगला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# जलजीवन मिशन, नाशिक जिल्हा परिषद राज्यात प्रथम




**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२७, नाशिक :** जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने १५ एप्रिल २०२४ पर्यंत जलजीवन मिशन अतर्गत एकूण मंजूर कामांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक कामे करून राज्यभरातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये आघाडी घेतली आहे. नाशिक जिल्हा परिषदेने मंजूर केलेल्या १२२२ योजनांपैकी ६१३ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्या असून जवळपास नाशिक एवढ्याच म्हणजे १२३९ पाणी पुरवठा योजनांची संख्या असलेल्या पुणे जिल्हा परिषदेच्या केवळ १४३ योजना पूर्ण झालेल्या आहेत. नाशिक जिल्हा परिषदेने पन्नास टक्क्यांपेक्षा योजना पूर्ण करून राज्यात आघाडी घेतल्यामुळे राज्यस्तरावरील आढावा बैठकीत नाशिक जिल्हा परिषदेचे कौतुक करण्यात आले. केंद्र सरकारने मार्च २०२४ पर्यंत प्रत्येक घराला नळाने शुद्ध पाणी पुरवठा करण्याचे ध्येय समोर ठेवून जलजीवन मिशन योजनेची घोषणा केली होती. केंद्र व राज्य सरकारच्या निधीमधून अंमलबजावणी होत असलेल्या या योजनेतून राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून २६ हजार ७८४ कोटी रुपयांच्या निधीतून ३३ हजार ८१८ योजनांना मंजुरी दिली आहे. या सर्व योजनांना ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत कार्यारंभ आदेश देण्याची मुदत होती. त्यानंतर या योजना मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, राज्यातील सर्वच जिल्हा परिषदांच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील रिक्त जागा, उपअभियंता, शाखा अभियंता यांची मोठ्या संख्येने रिक्त असलेली पदे यामुळे या योजनांसाठी सर्व्हे करणे, अंदाजपत्रक तयार करणे यात मोठ्याप्रमाणाव त्रुटी राहिल्या. चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांच्या आधारे मुदतीत टेंडर प्रक्रिया राबवण्यात आल्या. मात्र, कार्यारंभ आदेश दिल्यानंतर प्रत्यक्ष जागेवर काम सुरू करताना ठेकेदारांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला उद्भवविहिरींचे ठिकाण निश्चित न करणे, धरण अथवा कालव्यांमधून पाणी उचलायचे असल्यास संबंधित विभागाची परवानगी घेतलेली नसणे, जलकुंभासाठी जागा निश्चित नसणे आदी कारणांमुळे ठेकेदारांना काम सुरू करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. यामुळे राज्यभरात जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणी पुरवठा योजनांची कामे अत्यंत संथ गतीने सुरू आहेत. सरकारने ठरवून दिलेल्या ३१ मार्च २०२४ पर्यंतच्या मुदतीत केवळ सरासरी २५ टक्के योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या आहेत. राज्यातील ३३८१८ योजनांपैकी साधारणत: साडेआठ हजार योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्याचे आढावा बैठकीत समोर आले. या योजना जागेवर पूर्ण झालेल्या असल्या तरी त्यातील फार थोड्या योजनांचे संबंधित ग्रामपंचायतींकडे हस्तांतरण झाले असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या योजना आधी ठरलेल्या ३१ मार्च २०२४ पर्यंत पूर्ण होणार नसल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने या योजनांना आता सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. मात्र, राज्यातील सध्याच्या योजनांची स्थिती बघता पुढच्या पाच महिन्यांमध्ये सर्व योजना पूर्ण होण्याची शक्यता फार कमी असल्याचे दिसत आहे. राज्याच्या पाणीपुरवठा विभागाने नुकतेच जलजीवन मिशनच्या पाणी पुरवठा योजनांचा आढावा घेतला असता त्यात नाशिक जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने १२२२ योजनांपैकी ६१३ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण केले असल्याचे आढळून आले आहे. पुणे जिल्हा परिषदेने १२३९ योजनांपैकी केवळ १४३ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण केल्या आहेत. त्याप्रमाणे नागपूर जिल्हा परिषदेच्या ६२२ योजनांपैकी २८९ योजना पूर्ण झाल्या आहेत. जळगाव जिल्ह्यातील १३५४ योजनांपैकी केवळ १५७ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या आहेत. नगर जिल्ह्यातील ८३० योजनांपैकी केवळ ८७ योजना पूर्ण असून नंदूरबार जिल्हयातील २६०५ योजनांपैकी ३८७ योजना पूर्ण आहेत.

# वाढत्या गार्मीने विद्यार्थी हैराण; शाळेकडून गावठी उपाय



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२७, कल्याण :** महाराष्ट्रावर एकीकडे अवकाळी पावसाचं संकट कायम आहे, तर दुसरीकडे मुंबईसह ठाणे कोकणात उष्णतेची लाट पाहायला मिळत आहे. मुंबई, ठाणेसह कोकणासाठी हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेची शक्यता वर्तवली असून उष्णतेचा यलो अलर्टही जारी केला होता. या उष्णतेचा फटका लहान लहान शाळकरी मुलांनाही बसताना दिसत आहे. जिकडे तिकडे उष्माघाताने अनेक नागरिक आजारी झालेले तसेच बळी पडण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. या गर्मी पासून आपल्या विद्यार्थ्यांना आराम मिळवा म्हणून कल्याण मधील sacred heart या शाळेने एक वेगळी शक्कल लढवली आहे. या शाळेच्या सर्व बसेस च्या टपावरती गोणपाट (गोणी) अंथरूण बांधण्यात आली आहे. या मुळे विद्यार्थ्यांना गर्मी पासून थोड आराम मिळवा असे यामागचे कारण असावे, असे प्रयोग दुसऱ्या शाळेनेही करावे जेणेकरून विद्यार्थ्यांना थोडा वेळ तरी गर्मीपासून आराम मिळावा असे नागरिकांकडून बोले जात आहे.

# देगलूरच्या जनतेमध्ये निवडणुकीबद्दल चर्चेला उधाण...

**अक्षराज : अब्दुल मुबिन**

**दि.२७, देगलूर (नांदेड) :** नांदेड लोकसभा सार्वत्रिक निवडणूनकांचे मतदान कार्य काल यशस्वी पणे संपूर्ण नांदेड जिल्ह्यात पार पाडले गेले.देगलूर शहरातील मतदानाची टक्केवारी अतिशय कमी झाली.याचे कारण असे की जनते मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणा विषयी फार नाराजी दिसून येत आहे.

नागरिकांनी ज्या नेत्यांना किंवा पक्षांना फार मान सम्मान दिला पण त्या नेत्यांचा आणि पक्षाचा जनतेला मात्र कसलाही लाभ मिळाला नाहीं. शेतकरी, मजूरदार, शिक्षित बेरोजगार तरुण युवा युवती मध्ये व तसेच नागरिकांना प्रश्न पडत होतं की नेमकं आम्ही काय म्हणून आणि कुणाला मतदान करावे आणि त्याचे काय परिवर्तन होईल अशी संभ्रम अवस्था व चर्चा जनतेतेतून व्यक्त होतं होती तर काही नागरिकांचे असे



ही म्हणणे होते की विकासासाठी सर्व निधी विविध स्तरावर मंजूर तर होतात मग प्रत्यक्ष त्या संबंधित कामांची सुरुवात अद्याप थोडीशी ही का झाली नाहीं विकासाच्या कामांना गती केव्हा मिळेल?विविध समस्या या केव्हा दूर होतील? तर काही नागरिकांना त्यांच्या नावांची पोलचिट ही पोहचली नाहीं तसेच काही भागात मतदान केंद्राला जाण्यासाठी महिला व वृद्धव्यक्तींच्या ने आण ची ही तितकी व्यवस्था दिसून आली नाहीं.तर काही जनते मध्ये मतदानाला घेऊन अस्वस्थता दिसत होती.

काही तरुण युवा युवतीनीं आपला मतदानाचा प्रथमच हक्क बजावला तेवढं मात्र त्यांच्यात निवडणुकीबद्दल उत्साह दिसून आला मात्र काही वृद्ध महिला पुरुषांनी मतदान करण्या कडे पाठ फिरवले असे दृश्य स्पष्ट दिसून आले.लोकशाही देशात कोणत्याही वेळेला कधी आणि कसलेही काहीही राजकीय भुकुंप होत आहेत एका पक्षातील नेते दुसऱ्या पक्षात केव्हाही जातं येत असल्याने ही जनते मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणा विषयी आणि नेत्यांविषयी एक प्रकारची चीड सुद्धा दिसून आली.या सर्वांचे परिणाम असे झाले की मतदानची टक्केवारी फारच कमी झाली.

# फकीरा ब्रिगेडचा महायुतीच्या अधिकृत उमेदवार अर्चना पाटील यांना जाहीर पाठिंबा

**अक्षराज : संगिता वनकळस**

**दि.२७, कळंब (धाराशिव) :** फकिरा ब्रिगेड ही मातंग व तत्सम वंचित जातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय उन्नतीसाठी तसेच दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुध्द संघर्ष करणारी तरुणांची राज्यव्यापी संघटना आहे..

युवकांना संघटीत करुन मातंग व तत्सम समाजावर झालेल्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात लढा देऊन न्याय मिळवून देण्याचे कार्य संघटनेने नेहमीच केले आहे.

महाराष्ट्र हे देशातील अव्वल दर्जाचे राज्य असून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे या महापुरुषांच्या विचारांचा वारसा या राज्याला लाभला आहे. भारतीय जनता पक्षाच्या ध्येय धोरणावर विश्वास ठेवून केंद्रात आणि राज्यात शासनाचे नेतृत्व करण्याची संधी तमाम जनतेने आपणास बहाल केलेली आहे. या संधीचे सोने करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे शासन प्रयत्नशील असून मातंग-दलित-बहुजन समाजाच्या अपेक्षा भारतीय जनता पक्षाकडून उंचावल्या आहेत.

महायुती सरकारने मातंग समाजाच्या विकासासाठी अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास



महामंडळास १००० कोटी रुपये मंजुर केले, मातंग समाजातील बेघरांना घरकुल योजनेतून हजारो घरांचे वाटप केले आहे. तसेच बार्टीच्या धरतीवर आर्टीची स्थापना, क्रांतीवीर लहुजी साळवे यांचे पुणे येथील स्मारकाचे आणि अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे ८ खंड प्रकाशित करुन त्याची किंमत अत्यंत अल्प दरात ठेवली आहे..

महाराष्ट्रामध्ये दलित समाजात लोकसंख्येने दुसऱ्या क्रमांकावर असलेला मातंग समाज बहुसंख्येने ग्रामीण भागात वास्तव्य करीत असून तो सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय विकासापासून वंचित राहिला आहे. आपले महायुती सरकार प्रत्येक घटकाच्या विकासासाठी कायम प्रयत्नशील असून येत्या काळात सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या तत्त्वानुसार अधिक गतीने कार्य होईल हा विश्वास आहे..

यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. संजय शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष प्रा.राजेंद्र लोदगेकर, प्रदेशाध्यक्ष शीरंग सरवदे, लातूर जिल्हाध्यक्ष संजय विरूळे, धाराशिव जिल्हाध्यक्ष लक्ष्मण खंडाळे, अंकूश कांबळे, नागिनी थोरात, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रायगड जिल्हा परिषद नावगाव शाळेचे संरक्षण भिंत बांधकाम पूर्णत्वास...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, अलिबाग (रायगड) :** समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई अंतर्गत राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांना आयटीआय लिमिटेड कंपनीमार्फत संरक्षण भिंत बांधकाम करण्यात आले आहे. या सरंक्षक भिंतीमुळे आता जिल्हा परिषद नावगाव शाळेला वाढत्या अतिक्रमणापासून, मोकाट गुरांच्या त्रासापासून सरंक्षण होणार आहे. शाळ साठी संरक्षण भिंत नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या प्रश्न ऐरणीवर आला होता.

संरक्षण भिंत बांधकाम होणार असल्याचे समजल्यावर शाळा स्तरावर समाधानाचे वातावरण तयार झाले.

रायगड जिल्ह्यातील इतर शाळांनाही



या योजनेतून संरक्षण भिंत बांधकाम करून मिळणार हे समजताच या उपक्रमाचे अनेक मान्यवरांनी कौतुक केले बांधकाम करण्यासाठी येणाऱ्या अडचणी समस्य्यांना गावातील प्रथम नागरिक, प्रतिष्ठीत व्यक्ती, शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक यांनी निराकरण केले व बांधकाम करण्यासाठीचा मार्ग मोकळा करून दिला. जिल्ह्यात संरक्षण भिंत बांधकाम पूर्ण केल्यानंतर त्यावर रंगकाम करून त्या संरक्षण भिंती बोलक्या करण्यासाठी गावातील नागरिक पुढे सरसावले आहे. शालेय परिसर सुशोभीकरण करण्यासाठी संरक्षण भिंतिच्या बाजूने झाडे लावण्यास शालेय व्यवस्थापन समित्या पुढाकार घेत आहे. रायगड जिल्ह्यामध्ये संरक्षण भिंत बाधकामासाठी ९६ शाळांची निवड करण्यात आली होती. जिल्ह्यातील कार्यकारी अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील कामे पूर्ण करण्यास शक्य झाले. या कामाचे अनावरण शालेय शिक्षण व क्रीडा विभाग चे प्रधान सचिव मा रणजितसिंह देओल यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग शिक्षणअधिकारी श्रीमती पुनीत गुरव, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच गट शिक्षण अधिकारी देखील उपस्तित होते. शालेय स्तरावर व ग्रामस्थांकडून मा. मुख्याध्यापक श्री. नरेंद्र गुरव यांनी शासन आणि अधिकारी मंडळींचे आभार व्यक्त केले व प्रकल्प संचालक यांचे जिल्हापरिषदेकडून विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

# पारनेरची जनता लंकेच्या पाठीशी खंबीर : सुभाष दिवटे

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि,२७, सुपा (अ.नगर) :** महाविकास आघाडीचा उमेदवार लोकनेते ,मा,आ.निलेश लंकेच्याच पाठीशी जनता ठाम पणे उभी आहे .आजचा मतदार हा गट,तटाच्या नेत्याच्या पाठीमागे कधी ही जाणार नाही.ज्या लोकनेत्याने प्रत्येक गरीब जनतेच्या कुटुंबात जावुन त्याच्या दुखा;ची जानीव करून घेतली ,आणी त्याला संकटकाळी मदत केली,तोच आमचा गरीबांचा कैवारी आहे,ज्याने आम्हा पारनेर जनतेला देवदर्शनाची आवड निर्माण करून गेली १५वर्षापासुन आम्हाला दर्शन घडवतो, तो आमचा कैवारी आहे.

कोरोना सारख्या महामारीच्या काळात स्व;ता रात्र दिवस उभा राहुन पारनेर नव्हे तर जिल्ह्यातुन येणारा कोरोना वृग्नाला कुटुंबातील सदश्य समजुन त्याचा जीव वाचवला.असा गरीब जनतेचा वारसा घेऊन निवडनुकीला उभा आहे. तरी आम्ही पारनेरमधील जनता ही लोकनेता निलेश लंकेच्याच पाठीशी उभी आहे.

पारनेर तालुक्याच्या विकास कामात लोकनेते आ.निलेश लंके कुठेही



कमी पडलेले नाहीत कोट्यावधी रुपयांचे कामे झाले आहेत,राहीलेली ही कामे होणार आहेत,पारनेर तालुक्यात रोडची कामे,तालुकाजोड रस्ते,नदीनाल्यावरती बंधारे,समाज मंदीरे,नदीवरती केटी बंधारे,वस्तीगृहे,असे अनेक कामे त्यानी केलेली आहेत.

पारनेर हा सरसेनापती बापटांचा तालुका,कम्युनिष्टांचा बाले किल्ला,थोर समाजसेवक आण्णा हजारेचा तालुका असलेल्या पारनेर तालुक्यातील उमेदवार जर खासदार झाला तर!सर्वाच्या आर्शिवादाने अहिल्यानगर जिल्हा हा सुजलंम सुफलंम झाल्याशिवाय राहणार नाही. असे पारनेर तालुका सहकार सेलचे अध्यक्ष सुभाष दिवटे (पाटील) यांनी प्रतिनिधीला मुलाखतीत सांगितले.

# विखेंना मिळाले भगवान गडाचे आशिर्वाद, येथील प्रेरणा घेऊन समाजासाठी काम करण्याचा संकल्प

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहमदनगर :** अहमदनगर दक्षिण लोकसभेचे उमेदवार डॉ सुजय विखे पाटील यांनी जिल्हयातील श्रध्देय गडाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. येथे येऊन काम करण्यासाठी मोठी उर्जा मिळते.

येथील प्रेरणा घेऊन समाजासाठी काम करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे त्यांनी सांगितले. खा. सुजय विखे पाटील यांनी आपल्या मतदार संघात प्रचारात आघाडी घेतली असून गावोगावी त्यांच्या भेटी वाढल्या आहेत. गावोगावी लोकांना भेटून महायुती सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्फत केलेल्या लोककल्याणकारी कामांची माहिती लोकांना देत आहेत. देशात सुरू असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हमी, ही सर्वसामान्य नागरिकांच्या



हितासासाठी आणि देशासाठी आवश्यक असून येणाऱ्या काळात देशाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खंबीर नेतृत्व असून देश त्यांच्या हाती सुरक्षित असल्याने लोकांनी पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराला मतदान करा असे आवाहन ते नागरिकांना करत आहेत. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ डॉ. सुजय विखे पाटील यांनी भगवान गड परिसरातील गावांना भेटी दिल्या यावेळी त्यांच्या सोबत आमदार मोनिका राजळे आणि इतर कार्यकर्ते होते.

यावेळी डॉ. विखे यांनी भगवान बाबांच्या समाधीला अभिवादन करत महंत शास्त्री महाराज यांचे आशिर्वाद घेतले. तसेच गड परिसरातील ग्रामस्थांशी संवाद साधला. तर ग्रामस्थांनी देखील त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा शब्द यावेळी दिला. खरवंडी, दैत्य नांदूर, टाकळी,पाथर्डी तालुक्यातील अनेक गावातील ग्रामस्थांनी सुजय विखे पाटील यांचे वाजतगाजत भव्य स्वागत केले. यावेळी संवाद साधताना ते म्हणाले की प्रथा, परंपरे प्रमाणे मी गडावर आलो आहे, शास्त्री महाराजांनी मला आशीर्वाद दिला आहे.

भगवानगडाच्या परिसराच्या विकासासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून आम्ही नेहमीच कटीबद्ध राहू असा देखिल विश्वास त्यांनी यावेळी ग्रामस्थांना दिला. तसेच भगवानगड हे महाराष्ट्रातील प्रमुख अध्यात्मिक केंद्र असून त्याचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्याचा मानस त्यांनी व्यक्त करत त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करणार असे त्यांनी सांगितले.

# यावर्षी सर्वदूर भरपूर पाऊस ; नदी - नाल्यांना पूर ?



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, राहाता (अ.नगर) :** यावर्षी सर्वदूर चांगला व भरपूर पाऊस पडेल. नदी – नाल्यांना पूर येईल,खरिप व रब्बी हंगाम चांगला होईल पण पेरी दोन होतील, अशी भविष्यवाणी राहाता येथिल वीरभद्र यात्रेत वीरभद्र देवस्थानचे पुजारी सोमनाथ भगत यांनी केली. वीरभद्र महाराजांच्या यात्रेत देवस्थानचे पुजारी सर्जेराव भगत हे प्रत्येक वर्षी पाऊस व येणारी पिके कसे असेल याचे भाकीत करतात. या वर्षापासून त्यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांचे चिरंजीव सोमनाथ भगत यांनी पावसाचे व पीक पेरणी कशी असेल याचे भाकीत केले. यात्रेची भविष्यवाणी ऐकण्याकरीता पंचक्रोशीतील नागरिक संपूर्ण रात्र जागे राहतात. पावसाबाबत झालेल्या भविष्यवाणीवर शेतकरी बांधव यावर्षीचे आपले आर्थिक गणिते कसे असेल याचा अंदाज लावतात. पुजारी सोमनाथ भगत यांनी सांगितले, यावर्षी सर्वदूर भरपूर व चांगला पाऊस पडेल. रोहिणी नक्षत्रात काही ठिकाणी भरपूर तर काही ठिकाणी कमी प्रमाणात पाऊस पडेल. मृग नक्षत्रात भरपूर प्रमाणात पाऊस पडेल. आर्द्रा नक्षत्रात पूर्ण चांगला पाऊस होईल. खरिप व रब्बी हंगामात पेर होईल परंतु त्या दोन होतील अशी भविष्यवाणी पुजारी भगत यांनी केली. भविष्यवाणी करण्याअगोदर पाच मातीच्या कच्च्या घागरी एका सरळ रेषेमध्ये ठेवून त्या घागरीवर देवीची घोंगडी अंथरली जाते. या पाण्याने भरलेल्या घागरीवरून मंदीराचे पुजारी तीन वेळेस चालतात. घागरी समोर पाच नागिनीच्या पानावर विडे ठेवले जातात. त्या विड्यांना नाव राजा, प्रजा, सुख, दुःख व दरिद्र्य असे नाव दिले जाते. या घागरी रीचल्यानंतर जो विडा जागेवर राहिला. त्याचा मानवतेला त्रास होतो. व घागरी रीचल्यानंतर ज्या दिशेने पाणी जास्त वाहील त्या दिशेला पाऊस जास्त होतो. अशा पद्धतीच्या भविष्यवाणी वरून शेतकरी बांधव व नागरिक या वर्षी पाऊस कसा होईल याचा अंदाज घेतात. यावर्षीची भविष्यवाणी करताना घागरी रीचल्यानंतर राजा नावाचा विडा जागेवर राहिला. नवसाला पावणारी ख्याती असलेल्या विरभद्र महाराज यांच्या यात्रेतील केलेल्या भविष्यवाणीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक वर्षांपासून भगत परिवाराकडे भविष्यवाणी सांगण्याची पिढी जात परंपरा सुरू आहे.

# झरी तालुक्यात केंद्र शासनाच्या घरकूल योजनेपासून अनेक गरजू वंचित

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.२७, झरी (यवतमाळ) :** झरी राज्यात ईतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी प्रधानमंत्री आवास घरकुल योजना राबविण्यात येत आहे. गरज असलेल्या सर्वांसाठी घरे २०२४ हे राज्य सरकारचे धोरण असून त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना सन २०२४ मध्ये स्वताचे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न आहे. मात्र तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीत पदाधिकारी स्वकीय नातेसंबधीकांना जवळच्या संबंधित व्यक्तींना बोगस कागदपत्रांच्या आधारे घरकूलांचे वाटप करण्यावर भर घालत असल्याचे चित्र आहे.

प्रधानमंत्री आवास घरकुल योजना ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांची निवड सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण २०११च्या आधारावर कुटूबांची प्रत्यक्ष पाहणी , छाननी करून ग्रामसभेमार्फत संवर्ग निहाय प्रतिक्षा यादी पी डब्लूएल तयार केले जाणार. यादी मध्ये अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक




व ईतर लाभार्थी योजनेत सहभागी करण्यात येत असल्याचा २८ ज्यूलै २०२३ चा शासन निर्णय आहे. आवास प्लस मध्ये अंतर्भूत होऊ न शकलेल्या अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी राज्य शासनाच्या रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना तसेच विमुक्त जाती भटक्या जमाती साठी यशवंतराव मुक्त वसाहत योजना धनगर आवास योजना उपल्ब्ध आहे.तथापी ईतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना वंचित राहू नये याकरीता मोदी आवास घरकुल योजना आहे ज्यात तीन वर्षात राज्यात १० लाख घरकूल उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाने मान्यता दिल्याचा शासन निर्णय आहे. आवास प्लस प्रतीक्षा यादीत नाव नसलेले लाभार्थी , आवास प्लस प्रणालीवर नोंद झालेले परंतु ॲटोमॅटीक सिस्टम द्वारे रिजेक्ट झालेले पात्र लाभार्थी , जिल्हा समितीने शिफारस केलेले लाभार्थी सहभागी होणार आहेत. असे २८ ज्यूलै २०२३ च्या शासन निर्णय मध्ये नमूद केले आहे. मात्र तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती मध्ये गरजू लाभार्थ्यांना डावलून स्वकीय नातेसंबधीकांना जवळच्या संबंधित बोगस व्यक्तींना घरकूलांच्या यादीत समाविष्ट केले जात असल्याची चर्चा सुरू आहे. काही ग्रामपंचायत मध्ये मागिल वर्षात स्वकीय नातेसंबधीकांना घरकूलांचे वाटप केल्याची बाब निदर्शनास आली आहे. हे उदाहरण डोळ्यासमोर आहे. सर्वांना घरे २०२४ हे राज्य शासनाच्या धोरणानुसार कामे करने अपेक्षित आहे मात्र शासनाचे नियम निर्देशांचे पालन न करता मनमानी सुरू असल्याने अनेक नागरिकांना घरकूल योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे.

घरकूल योजनेत गरजू लाभार्थ्यांना प्राधान्य दिले जावे असे ग्रामसभेत बोलले जाते मात्र सभा संपताच मनमानी पद्धतीने कारभार सुरू होत असल्याचे चित्र तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीत प्रकार घढत असल्याचे चित्र आहे. तालुका पंचायत समिती कार्यालय मार्फतही मार्फतही या विषयावर गंभीरतेने बघीतले जात नाही. ही वास्तविकता आहे. त्यामुळे घरकूल योजना कागदावरच मर्यादित राहात असल्याने आजही अनेक काही नागरिकांना घरकूल समस्या कायमच भेडसावत आहे.

# साडेपाच लाखांची लाच घेताना तोतया वनअधिकारी अटकेत

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७, दिवा (ठाणे) :** शीळ डायघर पोलीस स्टेशनच्या हद्दीत फिर्यादी नफीस अहमद सिद्दीकी रा. मुंब्रा, ठाणे यांचा शिळ डायघर परिसरात बांधकाम व्यवसाय असुन आरोपी प्रसादकुमार उत्तम भालेराव वय ३३ वर्षे, रा. डायघर गाव, ता. जि.ठाणे याने फिर्यादी व इतर शिळ डायघर परिसरातील बांधकाम व्यावसायिकांना आरोपी प्रसादकुमार याने तो फॉरेस्ट अधिकारी असल्याचे सांगुन फिर्यादी व त्यांचे इतर बांधकाम व्यावसायिक यांचे चालू असलेल्या बांधकाम विरूद्व फॉरेस्ट कार्यालय येथे तकार करून व माहितीचा अधिकाराचा दुरउपयोग करून फिर्यादी व इतर बांधकाम व्यवसायिक यांचेकडुन वेळोवेळी पैसे वसुल केले होते.

आरोपीने फॉरेस्ट ऑफिस व इतर कार्यालयात केलेल्या तक्रारी मागे घेण्यासाठी वन टाईम सेटलमेंट करिता फिर्यादी व त्यांचे बांधकाम व्यावसायिक मित्र यांचेकडुन दिनांक २३/०४/२०२४ रोजी ७,६०,०००/ रू.ची खंडणीची मागणी केली होती. यापैकी ०५ लाख ६० हजार रूपये स्विकारंतांना आरोपी प्रसादकुमार उत्तम भालेराव यास खंडणी विरोधी पथक तसेच विशेष कृती दल यांनी सापळा रचून दि. २५/०४/२०२४ रोजी दोस्ती बिल्डींग, खान कंपाउंड



शिळगाव, ठाणे परिसरात रंगेहात पकडले आहे.

आरोपी प्रसादकुमार याचेकडुन खंडणीची स्विकारलेली रक्कम व तीन मोबाईल फोन जप्त करण्यात आले. प्रकरणी शिळ डायघर पोलीस ठाण्यात गु.रजि. नं. ८७४/२०२४ भा.दं.वी.क.३८४,३८५,३८७,५०६ (२),१७० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# खासगी बस दरीत कोसळली २८ प्रवासी जखमी...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, बुलडाणा :** इंदुरहून अकोल्याकडे जाणारी खासगी प्रवासी बस दरीत कोसळली. ही घटना बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद ते बुऱ्हाणपूर दरम्यानच्या करोली घाटात घडली. अपघातात बसमधील २८ प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर मध्यप्रदेशमध्ये उपचार सुरू आहेत. इंदोर येथील रॉयल ट्रॅव्हल्सची बस अकोल्याकडे जात होती. दरम्यान चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस दरीत १०० फूट खाली कोसळली. दुर्गम अशा करोली घाटात अपघात झाल्याने मदत कार्य उशिरा सुरू झाले. मात्र घटनेची माहिती मिळताच मध्यप्रदेश पोलीस व रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. अपघातात २८ जण प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर दर्यापूर व बुऱ्हाणपूर (मध्यप्रदेश ) येथे उपचार सुरू आहेत.